**शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय**

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. क्र dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com


---

जा.क्र./शिउसं/उमाशि ४०२/अर्धवेळ मा./पुवि/२०-२१/ 128

दिनांक / - 4 JAN 2020

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व अनुदानित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे/ अहमदनगर/ सोलापूर

विषय:- शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मधील अर्धवेळ शिक्षक /प्रति घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षकांच्या वेतनाबाबत

संदर्भ:- १. मा. आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र जा.क्र. आका/संचमान्यता / आस्था-व (१२२)/३२०१, दिनांक १०.९.२०१५

२. अधीक्षक (माध्यमिक) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, सोलापूर यांचे पत्र जा.क्र वेपसो/कमविअर्धवेळ/३८६/२०१८, दिनांक १७.४.२०१८

३. शासन निर्णय क्र. वेतन/ १२१८/प्र.क्र. २८/१८/टीएनटी-३, दिनांक २१.८.२०१८

४. मा. श्री. दत्तात्रय सावंत, विधानपरिषद सदस्य यांचे पत्र दिनांक ८.१०.२०१८

५. विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना यांचेसमवेत दिनांक १२.१०.२०१८ रोजी झालेल्या सहविचार सभेतील चर्चेनुसार

६. सचिव, सोलापूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय संघ सोलापूर यांचे दिनांक १६.४.२०१९ चे पत्र .

७. या कार्यालयाचे जा.क्र. शिउसं/उ.मा.वि./४०२/पुवि/ अर्धवेळ वेतन ,दिनांक ६.५.२०१९ चे पत्र

शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये शासन निर्णयानुसार इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांची शाखानिहाय संच मान्यता न करण्यावावत शासन आदेश झालेला आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये विभागातील कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयाची संच मान्यता होणार नाही.

शैक्षणिक वर्ष सन २०१८-२०१९ मधील संच मान्यतेनुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात मंजूर असलेली अर्धवेळ शिक्षक /प्रति घडयाळी तासिका तत्वावरील पदे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये कार्यभारानुसार उपलब्ध असतील तर या पदांवर पूर्वीपासून कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त अर्धवेळ / प्रति घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सन २०१९-

Scanned by CamScanner

२०२० उदभवला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये आपल्या कनिष्ठ महाविदयालयात विदयार्थी संख्येनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ प्रमाणे अर्धवेळ / प्रति घडयाळी तासिका तत्वावरील पदांना कार्यभार शिल्लक असल्यास, तशा प्रकारचे हमीपत्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांना सादर करावे आणि संबंधित शिक्षकांचे वेतन तात्काळ अदा करणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यांत यावी.

(अनुराधा ओक)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-
३. मा. श्री दत्तात्रय सावंत विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य मुंबई

प्रत : माहितीसाठी रवाना

विभागीय पुणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना पुणे
सचिव दि सोलापूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघ, सोलापूर

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी रवाना

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे अहमदनगर सोलापूर /- शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये संच मान्यता होणार नसल्यामुळे उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या कडून अर्धवेळ / /प्रति घडयाळी तासिका तत्वावरील पदांचा कार्यभार उपलब्ध असल्याबाबतचे हमीपत्र घेऊन संबंधितांना वेतन अदा करण्याची कार्यवाही तात्काळ आपल्या स्तरावरुन करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

Scanned by CamScanner

# हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शासन निर्णयानुसार संच मान्यता होणार नाहीत, त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कार्यभार निश्चिती तथा पदनिश्चिती होणार नाही. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील संच मान्यतेनुसार माझ्या कनिष्ठ महाविद्यालयात अर्धवेळ ----- व प्रती घड्याळी तासिका(प्र.घ.ता) ------ अशी एकूण ------ अस्थायी पदे मंजुर असून ती सर्वच्या सर्व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये भरलेली होती, व त्यास शिक्षण उपसंचालक कार्यालयाची मान्यता सुध्दा होती.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शाखानिहाय पुढील प्रमाणे इयत्ता ११ वी व १२वी ची विद्यार्थी संख्या आहे.

| अ.क्र. | शाखा/तुकडी संख्या | इ.११वी | इ.१२ वी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कला | | | |
| २ | वाणिज्य | | | |
| ३ | विज्ञान | | | |
| ४ | संयुक्त | | | |
| | **एकूण** | | | |

उपरोक्त विद्यार्थी संख्येप्रमाणेच गतवर्षी २०१८-१९ मध्ये विद्यार्थी संख्या आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाची होती. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वरील प्रमाणेच अर्धवेळ---- व प्रघता------ अशी एकूण ----- अस्थायी पदांचा कार्यभार उपलब्ध आहे. सदर अस्थायी पदांवरील यापुर्वी मान्यता दिलेल्या शिक्षकांचीच नियुक्ती केलेली असल्यामुळे संबधित शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे वेतन अदा करण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे विद्यार्थ्यांची दिलेली माहिती ही मी पुर्णपणे तपासून दिलेली असल्यामुळे भविष्यात दिलेल्या माहितीत काही तफावत आढळुन आल्यास व त्यानुसार कार्यभारामध्ये बदल होऊन एखादे अस्थायी पद रद्द झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही माझी राहील, त्याचप्रमाणे संबधितास अदा झालेले जादाचे वेतनवसूल करुन देण्याची जबाबदारी सर्वस्वी ही माझी राहील त्यास मी संपुर्णपणे जबाबदार राहील याची मी हमी देत आहे.

(स्वाक्षरी)
(नाव व शिक्का)

दिनांक :- /०१/२०२०
स्थळ :-

Scanned by CamScanner